# माध्यमिक शाळेतील मुले व मुलीची 'स्व' विषयक सद्यस्थिती

प्रा.डॉ.गोकुल शामराव डामरे
स्व.उत्तमराव देशमुख महाविद्यालय,शेगांव

'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती ' या म्हणीप्रमाणे प्रत्येक व्यक्ती ही भिन्न असलेली दिसून येते. प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावात, राहण्याच्या पध्दतीत, चालण्याच्या पध्दतीत, अन्न सेवन करण्याच्या पध्दतीत अध्ययन क्षमतेत एक व्यक्ती हीदुस—या व्यक्तीपेक्षा भिन्न असते. अशा व्यक्तीमत्वाचा विद्यार्थ्यांचा अध्ययनावर परिणाम होत असतांना दिसून येतो. प्रत्येक विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व हे वेगळे असते. प्रत्येक विद्यार्थी काहीना काही विचार करीत असतो. आजच्या मानवी जीवनात शिक्षणाला एक महत्वाचे स्थान आहे. हे शिक्षण देण्याचे कार्य शाळा, महाविद्यालय तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून होत आहे. आजच्या या शिक्षणात स्वतंत्र विचारशक्ती शोधप्रवृत्ती, कल्पनाशक्ती, नवनिर्मीती या सारख्या मानसिक क्षमतांचा मूळीच वाव दिसून येत नाही. आजच्या शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्याच्या हातून नवनिर्मीती व्हावी हो अपेक्षा असते व्यक्तीच्या मनात अनेकविध कल्पना येत असतात. त्या सर्व कल्पनांची अभिव्यक्ती होतेच असे नाही. ब-याचदा संकोच, भिती, टिका योग्य—अयोग्यतेमुळे देखिल कल्पना मांडल्या जात नाही. त्या कल्पना दडपून टाकल्या जातात. त्यामुळे अनेक मौलिक विचार समोर येऊ शकत नाहीत. व विद्यार्थ्यांचे नुकसान होते. म्हणून विद्यार्थ्यांच्या कल्पनांना, विचारांना मुक्त —वाव देणे आवश्यक असते. तसे पाहिले तर व्यक्तीच्या अंगी सर्जनशीलता कमी अधिक प्रमाणात असतेच.विद्यार्थ्यांचा परिपूणविकास होण्यासाठी स्वसंकल्पनेचा विकास होणे सुध्दा गरजेचे आहे. व्यक्तीला जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वसकल्पना विकसित होण्याची सुध्दा गरज आहे. स्वसंकल्पना विकसित झाल्यामुळे व्यक्तीला स्वतःबद्दलची संपूर्ण माहिती प्राप्त होते वत्यातूनच व्यक्तीचा व्यक्तीमत्व विकास होतो.विद्यार्थ्यांना स्वतःची जाणीव करून देण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या अंगी कोणकोणते गुण आहेत तसेच कोणकोणत्या त्रुटी आहेत हे जाणुन घेण्यासाठी या संशोधनाची गरज आहे. तसेच त्रुटींवर उपाययोजना करणे सुध्दा गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करून त्यांना यश प्राप्तकरण्यासाठी प्रस्तुत संशोधन करण्याची गरज निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या स्वसंकल्पनेचा विचार करायला हवा जर विद्यार्थ्यांची स्व संकल्पना जागृत झाली. तरच विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास चांगल्या रितीने होऊ शकेल व तो या युगात टिकू शकेल म्हणूनया विद्यार्थ्यांमध्ये स्वसकंल्पना शाळांमधून कितपत विकास केला जातो. तसेच व्यक्तिमत्व विकास होण्यास कितपत हातभार लावला जातो हे जाणून घेण्यासाठी घेण्यासाठी प्रस्तूत संशोधनाची गरज निर्माण झाली आहे.

'स्व' चा विकास म्हणजे व्यक्ती आणि 'पर्यावरणीय अनुभवांचे घटना क्षेत्र' यात होणारी सातत्यपूर्ण आंतरक्रियांची परिणामकारकता होय. यातूनच व्यक्तिमत्व विकास घडून तो पूर्णत्वास जातो परिपूर्ण होतो.कॉल 'रॉजर्स यांने 'स्व' आणि स्व विकास या व्यक्तिमत्व विकासातील दोन पैलूवर अधिकतम भर दिला आहे. प्रत्येक व्यक्तीचे अनुभव स्वतंत्र, खाजगी असते. ज्यात तो रममाण होते, व्यक्तीच्या 'स्व' ला जेव्हा धोका निर्माण होतो किंवा तो संकटात सापडतो तेव्हा त्याचे संरक्षण करण्याचा प्रयत्न व्यक्ती करते. सामान्य परिस्थितीत व्यक्ती विवेकनिष्ठ, स्व—विकास साधणारी स्वास्थ संपन्न होणारी असते.

**स्व—संकल्पनेचे घटक :—**

**१) स्व —एकरुपता (Self Identity) :—**

जन्मतः आपला 'स्व' विकसित झालेला नसतो. नवजाताला त्याचे शरीर कोठे संपते व त्याचा परिवेश कोठे सुरु होतो हे कळत नसते. तथापि विकास परत्वे त्याला शरीर आणि परिवेश यातील भेद कळ् लागतो. स्वतःचे शरीर इतर व्यक्तीपासून आणि सभोवतालच्या वातावरणापासून वेगळे आहे. याची जाणीव होऊ लागते. स्व—शरीराविषयी होणा—या या संवेदनालाच 'देह प्रतिमा' असे म्हणतात. व व्यक्तीच्या स्व—संकल्पनेचा तो आदिम गाभा असतो. मूल थोडे मोठे झाल्यावर घरातील माणसे त्याच्यावर जबाबदारी

टाकतात. त्यातून ते स्व–क्षमतांचा उपयोग करण्यास आणि स्वतःच्या भावनांना आवर घालण्यास शिकते. या वयात स्वतः विषयी विशेष जाणीव निर्माण होते. स्वतःच्या क्षमतांची ओळख पटू लागते. इतरांशी तुलना करून स्वत्व जपण्याची वृत्ती वाढीस लागते. वाढत्या वयाबरोबर बालकाचा अनुभवही वाढत जातो. सामाजिकीकरण सुरु होते. व्यक्तीच्या स्व–संकल्पनेत परिवेशातील अनेकविध वस्तू व्यक्तींचा अंतर्भाव होतो. व आता मी ऐवजी माझे–आमचे अशा प्रकारच्या प्रतिक्रिया दिल्या जाऊ लागतात. यातूनच पुढे कुटूंब, शेजारी, मित्र, शाळा, गांव, देश यांच्याविषयी प्रेम निर्माण होते व सामाजिक आणि सांस्कृतिक आंतरक्रियांच्याद्वारे स्व–संकल्पना आधिक दृढ होत जाते.

**२) स्व –मूल्यांकन :–**

स्व–एकरूपता विकसित होत असतानाच व्यक्ती स्वतःविषयी गुणात्मक निर्णय घेऊ लागते. व त्यात चांगले–वाईट श्रेष्ठ–कनिष्ठ, पूर्ण–अपूर्ण, योग्य–अयोग्य इत्यादींचा समावेश होतो. व त्यालाच स्व–मूल्यांकन असे म्हटले जाते. स्व–मूल्यांकन हे इतर लोक व्यक्तीकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहतात त्यावर अवलंबून असते. यात प्रामुख्याने आई–वडिलांचा वाटा महत्वाच्या असतात. त्याचबरोबर शेजारी –पाजारी, मित्रपरिवार शिक्षक व सभोवताली वावरणाऱ्या व्यक्तींच्या प्रतिक्रियाही महत्वाचा 'स्व' विषयीचा सकारात्मक वा नकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो. इतर व्यक्तींनी त्यांचे कौतुक केली त्यांच्याविषयी प्रेमाच्या, आपुलकीच्या, स्वीकार्हतेच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या की व्यक्ती 'स्व' विषयी सकारात्मक मूल्यांकन करण्यास प्रवृत्त होते. याउलट इतरांनी सतत नावे ठेवल्यास, अस्वीकार केल्यास नकारात्मक मूल्याकनास प्रवृत्त होते. सकारात्मक स्व मूल्यांकनालाच स्व–आदर असे म्हणतात.

**३) आदर्श स्व :–**

व्यक्तीच्या आदर्श 'स्व' मध्ये स्व–विषयक भविष्यकालीन कल्पना, व्यक्तीच्या आशा–आकांक्षा, महत्वाकांक्षा इत्यादींचा समावेश होतो. व या सर्व घटकांमुळे व्यक्तीला प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी जी उर्जा व दिशा मिळते. त्यामुळे व्यक्तीची स्व–प्रतिमा सुधारते, 'स्व' च्या प्रगल्भ विकासाला हातभार लागतो. व्यक्तीने स्वीकारलेले ध्येय आकांक्षा सहज साध्य आहे की अवघड आहे हे व्यक्तीची क्षमता, उपलब्ध संधी आणि दुर्दम्य इच्छाशक्ती यावरून ठरविता येते. सामान्यपणे आकांक्षा ही वास्तव स्वरूपाची असावी.

**शोध निबंधाचे शीर्षक :**

"माध्यमिक शाळेतील मुले व मुलीची 'स्व' विषयक सद्यस्थिती."

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये:**

1.माध्यमिक शाळेतील मुलांच्या 'स्व' विषयक सद्यस्थितीचा आढावा घेणे.
2.माध्यमिक शाळेतील मुलींच्या 'स्व' विषयक सद्यस्थितीचा आढावा घेणे.
3.माध्यमिक शाळेतील मुले व मुलीची 'स्व' विषयक सद्यस्थितीची तुलना करणे

**शोध निबंधाची परिकल्पना :**

1.माध्यमिक शाळेतील मुले व मुलीचा 'स्व' विषयक सद्यस्थितीतील फरक सार्थक आहे.

**शोध निबंधाची व्याप्ती व मर्यादा :**

1) प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील मुले व मुलीच्या 'स्व' विषयक सद्यस्थितीचा समावेश करण्यात आला
2) प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील इयत्ता 9 वी च्या मुले व मुलीचा समावेश करण्यात आला आहे.

**शोध निबंध संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंध संशोधन हे वर्तमानकाळाशी संबंधीत असल्यामुळे सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे.

**शोध निबंध नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनासाठी सुगम यादृच्छिक न्यादर्श पध्दतीने माध्यमिक शाळेतील 50 मुले व 50 मुली यांची निवड करण्यात आली आहे.

**शोध निबंध संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनासाठी 'स्व' संकल्पना चाचणीचा साधन म्हणून उपयोग करण्यात आला आहे.

**शोध निबंध संख्याशास्त्रीय तंत्र :**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी **'t'** मूल्य या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**माध्यमिक शाळेतील मुले व मुलीच्या 'स्व' विषयक सद्यस्थितीची तुलना दर्शविणारी सारणी**

| गट | नमुना | मध्यमान M | SD | प्रमाण त्रुटी | प्राप्त 't' | DF | सारणीवरून t मूल्य | | सार्थकता | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुले | 50 | 21.14 | 5.34 | 0.63 | 3.90 | 98 | 0.05 | 0.01 | 0.05 | 0.01 |
| मुली | 50 | 23.6 | 4.52 | | | | 1.99 | 2.63 | सार्थक | सार्थक |

## शोध निबंध निष्कर्ष :

1.माध्यमिक शाळेतील मुले व मुलीचा 'स्व' विषयक सद्यस्थितीतील फरक साथक आहे.

2.माध्यमिक शाळेतील मुलाच्या तुलनेत मुलीची 'स्व' विषयक सद्यस्थिती अधिक चागली आहे.

3.व्यक्तीची वृत्ती व्यक्तिच्या भावना, भावनिक विकास निर्मिती झाली म्हणजे 'स्व' चा विकास होतो.

4.व्यक्ति वर्तनाला नियंत्रित करणाऱ्या व व्यक्तिला समायोजन करण्यास मदत करण्याचे काम 'स्व' करते.

5.व्यक्तीच्या 'स्व' ला जेव्हा धोका निर्माण होतो किंवा तो संकटात सापडतो तेव्हा त्याचे संरक्षण करण्याचा प्रयत्न व्यक्ती करते.सामान्य परिस्थितीत व्यक्ती विवेकनिष्ठ, स्व—विकास साधणारी स्वास्थ संपन्न होणारी असते.

6.स्वसंकल्पनेत व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वप्रतिमांचा समावश होतो.

7.स्वत:विषयी आणि इतर व्यक्ती, समुह व संस्थाविषयीच्या समजुती, मूल्ये आणि अभिवृत्ती यांचे संकलन 'स्व' मध्ये असते.

8.सजीव आणि स्व या दोन्हीतील एकजन्सीपणातून व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. त्यातील आदर्श स्व आणि वास्तव स्वयातील विचारात एकवाक्यता अधिक असल्यास ती व्यक्ती संतुलित आचरणाची, सदाचारी व आनंदी असेल.

9.स्व—संकल्पनेचा विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासावर परीणाम दिसून येतो.

10. विविध टप्प्यात होणारा हा 'स्व' चा विकास सूसूत्रपणे व अखंडीतपणे चालू असतो.

## शोध निबंध शिफारशी

1.विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्तीमधून स्व—संकल्पना निर्माण करण्यात यावी.

2.विद्यार्थ्यांचा स्व—संकल्पना वाढविण्याकरिता उपक्रम राबविले जावे.

3.शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्व विकासासंदर्भात, स्व—संकल्पना अधिकाधिक विकास होण्यासाठी वर्ग अध्यापनात कृतीशिलतेला वाव दयावा.

4.शालेय व वैयक्तिक स्तरावर चर्चासत्रे आयोजित करावेत आणि मुलांना सहभागी होण्याकरिता प्रोत्साहन द्यावे.

5.शिक्षकांनी विविध प्रकारच्या अध्यापन पद्धतीचा उपयोग करावा. जसे कथाकथन पद्धत, नाट्यीकरण पद्धत,गटचर्चा पद्धत, क्रीडन पद्धत इ. चा उपयोग करावा.

6.विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होण्याकरिता व्यक्तिमत्वाला स्व—सन्मानाची जोड द्यावी.

## संदर्भ गंथसूची

1.आगलावे, प्रदीप (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर, विद्या प्रकाशन.

2.कर्डिले वसंतराव, महाले संजीवनी (२०००), संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन, नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

3.जगताप ह. ना. (२००६), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे, नूतन प्रकाशन.

4.राणे एस. एस. (२००२), मानसशास्त्र, जळगांव : प्रशांत पब्लिकेशन,

5.वीरकर प्र. क्र., गद्रे,सामंत द. गो. (1963 ), प्रायोगिक व शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे : ठोकळ प्रकाशन.